महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव
GOVERNMENT MEDICAL COLLEGE & HOSPITAL, DHARASHIV
कोविड-१९ इमारत, जिल्हा रुग्णालय आवार, धाराशिव. (महाराष्ट्र) 413 501
**e-mail:** deangmcosmanabad@gmail.com

जा.क्र./शावैमवरुधा/कि.भांडार/रा.यो./दरपत्रके/ 997 /२०२५ दिनांक: 16 /05 /२०२५

प्रति,

--------------------------

--------------------------

--------------------------.

विषय: - राज्य योजनेत्तर योजना (नॉन-प्लॅन) सन २०२५-२६ करिता मंजूर निधीतून संस्थेच्या परिसरातील ऑक्सीजन शेडची लांबी-रुंदी वाढविणेबाबत, खरेदीकरिता दरपत्रके प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ: - दिनांक १५/०५/२०२५ रोजीची मंजुर कार्यालयीन टिप्पणी.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव या संस्थेतील संस्थेच्या परिसरातील ऑक्सीजन शेडची लांबी-रुंदी वाढविण्याची आवश्यकता आहे.

तरी विषयांकित काम करणेकामी इच्छुक निविदा धारकांकडुन दरपत्रके मागविण्यात येत आहेत. करिता पात्र निविदाधारकांनी दि. 16 / 05 /२०२५ ते दि. 23 / 05 /२०२५ पर्यंत दरपत्रकातील विहित अटी व शर्तींना अनुसरुन खालील नमुद पत्त्यावर कार्यालयीन वेळेत सिलबंद लिफाफा मध्ये आपले दरपत्रक सादर करावे.

(डॉ.शैलेंद्र द. चौहान)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
व रुग्णालय, धाराशिव.

प्रत : - १) सुचना फलक जाहीर नोटिस, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव.
२) संकेतस्थळ, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव.

**कार्यालयाचा पत्ता**

**अधिष्ठाता,**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जिल्हा सामान्य रुग्णालय आवार, धाराशिव-४१३ ५०१**

## दरपत्रक नोटिस

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव करिता संस्थेच्या परिसरातील ऑक्सीजन शेडची लांबी-रुंदी वाढविणे कामी निविदा धारकांकडुन दरपत्रके मागविण्यात येत असुन दि. 16/05/२०२५ ते दि. 23/05/२०२५ पर्यंत इच्छुक निविदाधारकांनी अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव येथे कार्यालयीन वेळेत सिलबंद लिफाफा मध्ये आपले दरपत्रक करार सादर करावेत.

**दरपत्रके सादर करतेवेळी अधिकृत लेटरहेड वर खालील प्रमाणे विहित नमुन्यात तसेच अटी व शर्तींना अनुसरुनच माहिती सादर करावी अन्यथा निविदा प्रक्रियेतुन अपात्र करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

| अ.क्र. | वस्तुचे नाव | प्रति नग किंमत (सर्व करांसहित) नमुद करावी |
|---|---|---|
| 1) | लोखंडी पत्रा १५ फुट | |
| 2) | लोखंडी पत्रा १२ फुट | |
| 3) | लोखंडी प्लेन पत्रा | |
| 4) | स्क्रु दीड इंच | |
| 5) | स्क्रु दोन इंच | |
| 6) | पाईप दीड बाय दीड इंच | |

**अटी व शर्ती:**

०१) दरपत्रक मोहरबंद लिफाफा दिनांक 23 /05/२०२५ पर्यंत सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत कार्यालयात पोहचतील या बेताने पाठवावेत. जाहिर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत/ ग्राह्य धरले जाणार नाहीत.

०२) सुचना फलक/ संकेतस्थळावरील जाहिर नोटीस प्रमाणे इच्छुक कंपनीस दरपत्रक मोहरबंद लिफाफा सादर करण्याची मुभा देण्यात येत आहे. दरपत्रक मोहरबंद लिफाफा "अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव" यांचे नावे विहित मुदतीत कार्यालयास सादर करावा.

०३) दरपत्रक मोहरबंद लिफाफ्यावर **"संस्थेच्या परिसरातील ऑक्सीजन शेडची लांबी-रुंदी वाढविणे करिता दरपत्रके"** तसेच मोहरबंद लिफाफा जमा करण्याचा **अंतिम दिनांक** दरपत्रधारकाच्या नावाचा **शिक्का** इत्यादी नमुद असणे आवश्यक आहे.

०४) दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात सादर करावयाचे दस्तऐवज: (Document) **जीएसटी (GST) क्रमांक असलेल्या अधिकृत लेटरहेडवर** दरपत्रक सादर करावे. त्यासोबत (१) जीएसटी प्राधिकृत प्रत, (२) पॅन कार्डची छायांकित प्रत, (३) शॉप ॲक्ट, (४)उद्यम आधार (५) आधार कार्ड (६) एकल दरपत्रक धारक असल्याबाबतचे हमीपत्र (सोबत नमुना जोडला आहे) **"ANNEXURE-A"** इत्यादी कागदपत्रे जोडण्यात यावीत.

०५) पूरवठाधारकास आगाऊ रक्कम (ADVANCE PAYMENT) अदा करण्यात येणार नाही. अपवादात्मक परिस्थितीमुळे देयक अदा करण्यास झालेल्या विलंबापोटी कोणत्याही स्वरुपाचे व्याज अथवा अतिरिक्त शुल्क/ रक्कम हे कार्यालय अदा करणार नाही. तसेच अशा प्रकारची कोणतीही मागणी मान्य करता येणार नाही.

०६) सर्वात कमी दर सादर करणाऱ्या पात्र निविदाधारकाचे दर हे पूढिल ०६ महिन्यांकरिता गोठविण्यांत येतील. कार्यालयाच्या आवश्यकतेनूसार पुरवठा आदेश निर्गमीत झाल्यापासुन वेळोवेळी त्याच दराने सामुग्री विहित वेळेत (१५ दिवसात) पूरवठा करणे बंधनकारक राहिल.

०७) अपवादात्क परिस्थितीमुळे उक्त कोणत्याही अटी अथवा शर्तीमध्ये आवश्यकतेनुसार अंशत: बदल करणे अथवा प्राप्त झालेली दरपत्रके कोणतेही कारण/पुर्वसुचना न देता नाकारणे तसेच कोणत्याही स्तरावर निविदा प्रक्रिया रद्द करणे इ. अधिकार संस्थाप्रमुख (अधिष्ठाता) यांनी राखुन ठेवलेले आहेत.

**नोंद:- सदर दर पत्रके मा.अधिष्ठाता यांचे दालनात उघडण्याची वेळ दिनांक. 27/05/25 रोजी ११.३० वाजता राहिल. सदर नियोजित वेळेत कोणताही बदल झाल्यास निविदाधारकांना तशी पुर्वसुचना देण्यात येईल.**

(डॉ.शैलेंद्र द. चौहान)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
व रुग्णालय, धाराशिव.